# संपादकीय

'नवज्योत' या आंतरविद्याशाखीय आंतरराष्ट्रीय संशोधन पत्रिकेच्या तमाम लेखक, वाचक आणि हितचिंतकास सदर अंक समर्पित करताना हर्ष होत आहे. वैश्विक पातळीवर तीव्र गतीने होणारे बदल आणि त्यांचे मानवी मुल्यांवर होणारे दूरगामी परिणाम चिंता व चिंतनाचा विषय झालेले आहेत. आपल्या देशाचा विचार करतांना अर्थव्यवस्थे संबंधी विविध पध्दतीने अभ्यास करणे आवश्यक आहे. भारतीय समाजावर राज्यशास्त्र प्रमाणेच अर्थशास्त्राचाही प्रभाव पडत असतो. तसेच भारतीय राज्यघटनातील तरतुदींचा सामाजिक व राजकीय प्रभाव, अर्थ विषयक आयोग आणि भारतीय संघराज्य व्यवस्था याचा अभ्यास सध्यस्थितीत करणे आवश्यक आहे. बदलत्या सामाजिक परिस्थितीत व धोरणामध्ये लोकशाही  व्यवस्थे समोरील हि विविध आव्हाने आहेत.

या संपूर्ण पार्श्वभूमीवर नवज्योतच्या शोध निबंधकारांनी आपल्या विषयाची मांडणी केली असून त्यानुसार आंतरविद्याशाखीय विश्लेषणाच्या कक्षा अधिक व्यापक केल्या आहेत. पर्यायाने या अंकाचा गुणात्मक दर्जा सुद्धा उंचावलेला आहे.

नवज्योतचे सल्लागार मंडळ, संपादक मंडळ आणि मूल्यमापन समिती यांचे सक्रीय योगदान तसेच लेखक, वाचक  व हितचिंतकाच्या सहकार्यामुळे 'नवज्योत' आपला गुणात्मक दर्जा अधिक गतिमान करणार यात शंका नाही.

प्रा. प्यारेलाल सूर्यवंशी

संपादक